UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक १०

G20
भारत 2023 INDIA

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
।। श्री विश्वनाथो विजयते ।।
स्थापना : ९ जानेवारी १९२७

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक १० – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)**

● **शके १९४४** ● **वर्ष : ९०** ● **पुरवणी अंक : १०**

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे ● प्रा. डॉ. मृदुला वर्मा ● प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्रा. डॉ. सुभाष वाघमारे ● प्रा. ऋषिकेश काळे ● प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.

या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

१२. जागतिक शांतता आणि प्रगतीसाठी संतांचे योगदान

- डॉ. राजेंद्र जयराम खंदारे ---------- ४८

१३. जागतिक शांतता व प्रगतीसाठी वारकरी संप्रदायाच्या संतांचे योगदान

- डॉ. विकास शंकर पाटील ---------- ५२

१४. विश्वशांती आणि संतांचे योगदान : एक दृष्टिक्षेप

- कु. नर्मदा रामा कुराडे ---------- ५६

१५. भारतीय चिंतन: कोंकणी साहित्यांत शांती आनी उदरगतीचे स्वर

- डॉ. पूर्णानंद च्यारी ---------- ५९

१६. जागतिक शांतता, प्रगती आणि आजचा वर्तमानकाळ

- प्रा. डॉ. विजया पाटील ---------- ६३

१७. वारकरी संतसाहित्यातील सामाजिक प्रगती व विश्वमांगल्याचा मूल्यविचार

- प्रा.पुरुषोत्तम प्र. सूर्य ---------- ६६

१८. जागतिक शांतता व प्रगतीसाठी मराठी भाषा व साहित्यिकांचे योगदान

- प्रा.डॉ.धनंजय होनमाने ---------- ७१

१९. जागतिक शांती आणि प्रगती या संकल्पनांसंदर्भात मिलिंद म्हामल यांच्या कथेची चिकित्सा

- पूर्वा पंडित वस्त, प्रो. संजयकुमार करंदीकर ---------- ७५

२०. शांतताय आनी उदरगतीची मोख सादपी कोंकणी विनोदी निबंद

- प्रा. सोनिया सिताराम गडकर ---------- ७९

२१. योगीराज वाघमारे यांच्या कथेतील शांतता व प्रगतीचे विचार

- कुंदा अशोक लोखंडे ---------- ८३

२२. महात्मा फुले यांच्या 'तृतीयरत्न' नाटकाचे सामाजिक व शैक्षणिक प्रगतीतील योगदान

- प्रा. डॉ. दत्ता पाटील ---------- ८६

२३. समाजोन्नतीसाठी काव्यातून व्यक्त झालेली जीवनमूल्यं आणि शांतीतत्त्व

- प्रा. विजया नारायण ठाकूर ---------- ९०

# अनुक्रमणिका


१. जागतिक शांतता व प्रगतीसाठी संतांचे योगदान

- डॉ. रविकांत शिंदे ---------- ७

२. आशा बगे यांच्या कथेतून व्यक्त झालेल्या सांगीतिक प्रतिमांचे विश्वशांती आणि विकासासाठी योगदान

- प्रा. प्रियांका अशोक कुंभार ---------- ११

३. जागतिक शांततेत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान व भूमिका

- प्रा. राधाकिसन पांडुरंग मुठे ----------१५

४. डॉ. प्रकाश पर्येंकार हांच्या कथेंतल्यान अभिव्यक्त जावपी मानवी मुल्यां, उदरगत आनी शांतताय

- सानिका गांवकार ---------- १९

५. जागतिक प्रगती आणि स्त्रीवादी चळवळ

- डॉ.गजानन लोंढे ---------- २२

६. नीरजा यांच्या कथेतील 'पावसात सूर्य शोधणारी माणसं'मधील शांती व प्रगतीच्या शोधात असलेली सक्षम स्त्री

- चैताली चिदानंद कोळी, डॉ. सुनीता उम्रस्कर ---------- २६

७. संत साहित्यात्यील चिरंतन मूल्ये आणि वैश्विक शांतता

- डॉ.सचिन माधवराव कोतकर ---------- २९

८. जागतिक शांतता व प्रगतीसाठी संतांचे योगदान

- डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत---------- ३२

९. जागतिक शांततेसाठी व प्रगतीसाठी संस्कृतीचे योगदान

- प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम ---------- ३६

१०. जागतिक शांतता व प्रगतीसाठी संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या पसायदानाचे योगदान

- डॉ.रेश्मा रमेश दिवेकर ---------- ३९

११. जागतिक शांतता, प्रगती आणि आजचा वर्तमानकाळ

- प्रा.गणेश जा.मस्के ---------- ४३

ISSN No. 2394-5990

# जागतिक शांती आणि प्रगती या संकल्पनांसंदर्भात मिलिंद म्हामल यांच्या कथेची चिकित्सा

**पूर्वा पंडित वस्त**
लेखक
संशोधक विद्यार्थी आणि सहायक प्राध्यापक
मराठी अध्ययनशाखा,
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा,
गोवा विद्यापीठ
Email - purva.vastaunigoa.ac.in

**प्रो. संजयकुमार करंदीकर**
सहलेखक
विद्यावाचास्पती मार्गदर्शक
प्रोफेसर व विभागप्रमुख
मराठी विभाग
महाराजा सयाजीराव विद्यापीठ
वडोदरा गुजरात

**सारांश :**

गोमंतकीय कथाकार मिलिंद म्हामल यांनी आपल्या कथेतून गोमंतकीय प्रदेशात खा-उ-जा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या बदलत्या समाजजीवनाचे व समाजवास्तवाचे चित्रण 'चतुर्थी', 'अलकाण्याचो डोंगर', 'मांड' या कथासंग्रहातून केलेले आहे. शहरीकरणाची वाटचाल करणाऱ्या गोमंतकीय प्रदेशात पर्यटन व्यवसायामुळे परंपरागत संस्कृती नष्ट होऊन नवी संस्कृती आकार घेत आहे. यात संस्कृतीबरोबर पर्यावरण, ग्रामीण कृषिसंस्कृती संपुष्टात येत आहे. या बदलांमुळे भाऊबंदकीत, नातेसंबधांमध्ये ताणतणाव निर्माण होत आहे तसेच प्रगतीची आणि विकासाची अयोग्य व्याख्या समोर येत आहे. मिलिंद म्हामल यांची कथा यावर भाष्य करत शांती व प्रगतीचा पुरस्कार करते. गोमंतकीय प्रश्न मांडत जागतिक शांती व प्रगतीची योग्य दिशा स्पष्ट करते.

**प्रस्तावना :**

१९९० च्या सुमारास भारतात आलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या लाटेमुळे भारतात जागतिकीकरणाची सुरवात झाली. भारतावर असलेल्या कर्जाची फेड व्हावी यासाठी वर्ल्ड बँक, आय.एम.एफ. सारख्या नामांकित संस्थांकडून कर्ज मिळविण्याच्या हेतूने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार भारताने केला. कर्ज मिळविण्यासाठी वर्ल्ड बँक, आय.एम.एफ. या संस्थांच्या अटी मान्य करून भारताने काही धोरणात्म बदल स्वीकारून भारतीय अर्थव्यवस्था विदेशी कपन्यांसाठी मुक्त केली. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने बहुराष्ट्रीय कंपन्यांचे (MNC'S) आगमन भारतात झाले. अर्थव्यवस्थेतील या बदलांना आर्थिक सुधारणा म्हटले गेले. खाजगीकरण, उदारीकरण आणि एकूण जागतिकीकरणाची सुरवात झाल्याने अर्थव्यवस्थेबरोबर समाज आणि सांस्कृतिक व्यवस्थेवर त्याचे पडसाद उमटले. खा-उ-जा संस्कृतीची चिन्हे सर्वत्र दिसू लागली. गावाची शहरे आणि शहरांची महानगरे निर्माण होऊ लागली. औद्योगिकीकरणामुळे स्थलांतरण बऱ्याच प्रमाणात होऊ लागल्या कारणाने शहरात लोकसंख्या वाढली त्याचप्रमाणे भारत हा भिन्न भाषिक आणि भिन्न सांस्कृतिक देश असला तरी सांस्कृतिक एकजिनसीपणा निर्माण होऊ लागला. औद्योगिकीकरण, भौतिक विकास, आधुनिकीकरण, बदलती शहरी संस्कृती, धावपळ याचा मानवी जीवनावर परिणाम होऊ लागला. शहरी गर्दी, गतीमानता, एकाकीपणा यामुळे मानवी नातेसबधात अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. नवमध्यमवर्ग निर्माण झाल्याने नवमध्यमवर्गाचे भावविश्व, त्याचे प्रश्न सामोरे येऊ लागले. प्रगतीच्या नावाखाली जीवघेणी स्पर्धा वाढली. स्त्री शिक्षित होऊ लागली पण स्त्रियांच्या व्यथा काही संपल्या नाही. आधुनिक स्त्री नवीन आव्हानाना सामोरी जाऊ लागली. २१ व्या शतकात भारतात शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढू लागल्याकारणाने शहरी समस्याही वाढू लागल्या. दूषित पाणी, वाढता कचरा, अस्वच्छ आणि अतिप्रमाणात झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. या वस्त्यांमध्ये आरोग्यविषयक अनेक समस्या भेडसावू लागल्या. दारिद्रय वाढले त्याचप्रमाणे गुन्हेगारी वृत्ती, जुगार अड्डे, खून, चोऱ्या, दरोडे, तस्करी, वेश्यागृहे, मद्यालये यातही वाढ झाली. स्वार्थ, सत्ता, संपत्तीच्या आणि प्रगतीच्या मार्गे धावता धावता अनेक नवीन प्रश्न डोकाऊ लागले. शहरीकरण म्हणजे सर्वसमावेशक प्रगतीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक चालशक्ती असल्याचे मानले जाते. शहरीकरणामुळे निर्माण होणारी सर्वसमावेशक प्रगतशील संस्कृती आणि जहाल असे शहरी प्रश्न यामध्ये मोठी दरी निर्माण झाली. प्रगतीची व्याख्या शहरी प्रश्नांसाहित पुढे येऊ लागली. त्यामुळे प्रगती व प्रश्न यामध्ये संबंध प्रस्थापित करू न देणे हे आजच्या बदलत्या समाजजीवनापुढ्यात असलेले महत्त्वाचे आव्हान ठरले. जे आजच्या नव्वदोत्तरी मराठी साहित्याच्या माध्यमातून अत्यंत चांगल्याप्रकारे टिपण्याचा प्रयत्न झालेला आहे. प्रस्तुत

शोधनिबंधामध्ये नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकार मिलिंद म्हामल यांच्या कथेतून जागतिकीकरणाच्या ओघात गोमंतकीय समाजजीवनात आलेले बदल, प्रगतीच्या, विकासाच्या दिशेकडे वळत असताना गोमंतकात निर्माण झालेले प्रश्न व एकूण 'वसुधैव कुटुम्बकम्' या तत्वानुसार मिलिंद म्हामल यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे केलेला शांतितत्त्वाचा पुरस्कार आणि प्रगत समाजाची योग्य दिशा, याची चिकित्सा करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

**जागतिक शांती आणि प्रगती याचा पुरस्कार करणारी गोमंतकीय कथाकार मिलिंद म्हामल यांची कथासृष्टी :**

गोमंतकीय लेखकांनी कथा या साहित्यप्रकाराची अत्यंत गांभीर्याने दाखल घेत महत्त्वपूर्ण असे योगदान दिलेले आपल्याला दिसून येते. गोवा मुक्तिपूर्व व मुक्तीनंतरच्या कालखंडामध्ये गोमंतकीय कथेचे स्वरूप बदलले दिसते. त्यात प्रदेशनिष्ठ स्वरुपाची वि. स. सुखटणकरांची कथा असो, मनोविश्लेषणात्मक अशी लक्ष्मणराव सरदेसाई यांची कथा असो वा कौटुंबिक स्वरुपाची पंडित महादेवशास्त्री जोशींची कथा असो. गोमंतकीय समाजजीवनातील बदलत्या समाजवास्तवाचे पडसाद या कथेतून उमटताना आपल्याला दिसून येतात. गोवा मुक्तीनंतरच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय बदलांचे पडसाद या कथेमध्ये उमटलेले दिसून येतात. तसेच १९९० नंतरच्या कालखंडात गोमंतकीय जीवनात झपाट्याने झालेल्या बदलांचे चित्रणही विठ्ठल गावस, नारायण महाले, उदय नाईक, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल ठाकूर यांच्या कथेतून दिसून येते. या कथाकारांमध्ये महत्त्वाचे नाव म्हणून मिलिंद म्हामल यांच्या कथेचा विचार करणे गरजेचे ठरते. मिलिंद म्हामल यांचे एकूण तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. यात 'चतुर्थी' (२००५) हा त्यांच्या पहिला संग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'आलकाण्याचो डोंगर' (२००८), 'मांड' (२०१४) असे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.

११९० नंतर आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेमुळे गोमंत प्रदेशातील बदलांचे चित्रण करणारी अशी मिलिंद म्हामल यांची कथा ठरते. गोमंत समाजजीवनात जागतिकीकरणाचे परिणाम केवळ अर्थव्यवस्थेपुरते मर्यादित राहिले नव्हते तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषिक्षेत्र, राजकारण इत्यादींवर उमटलेले होते. खाणव्यवसाय आणि त्यानंतर खाण व्यवसायावर लादलेली बंदी यामुळे पर्यटनक्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. गोवा हे भारताचे नंदनवन मानले जाते. अशा या निसर्गसंपन्न अशा गोव्यात पर्यटनास प्राप्त झालेले महत्त्व आणि विकास व प्रगतीच्या नावाखाली केलेल्या पर्यावरण व संस्कृतीच्या ऱ्हासाचे पडसाद मिलिंद म्हामल यांच्या कथेतून उमटतात. पर्यटनव्यवसायामुळे निर्माण झालेले गोमंतकीय वास्तव हा त्यांच्या कथेचा स्थायीभाव असल्याचे आपल्याला दिसते.

'चतुर्थी' या कथासंग्रहात आलेल्या पहिल्याच 'चतुर्थी' या कथेत सदा आणि शिवा या दोन्ही भावांच्या नात्यामध्ये आलेल्या दरीचे चित्रण लेखक करतात. पर्यटन व्यवसायाला गती मिळाल्याकारणाने वडिलोपार्जित जमीन फक्त संपत्तीच्या हौसेने हॉटेल बांधण्यास विकायचा शिवरामचा निर्णय न पटल्याने दोघा भावांमध्ये निर्माण झालेला भावनिक ताण लेखक चित्रित करतात. या कथासंग्रहातील 'घर' या कथेमध्येही भाऊबंधकीमुळे निर्माण झालेले प्रश्न व आपाची शोकांतिका लेखक मांडतात. 'गोलकारनीचा कुवेटकार' या कथेत परदेशात कूवेटमध्ये कामानिमित्त गेलेल्या मुलामुळे गोलकारनीच्या घरात संपत्ती नांदू लागल्याकारणाने शेती भाटांकडे दुर्लक्ष केले जाते. शेतं पडिंग पडतात. घरातील शेणाच्या जमिनीची जागा टाईल्स घेतात. घरकामासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हायला लागतो. व्यसनाधीनता वाढते. गोलकारनीचा धाकटा मुलगा गोव्यात येणाऱ्या पर्यटकांना भाडोत्री तत्रावर गाड्या देऊन कमावतो. शेतांकडे पुर्णपणे दुर्लक्ष केलेली गोलकारनीच्या मुलाची नोकरी बुडाल्याने ती पुन्हा शेतीकडे वळते. कृषी संस्कृतीचे महत्त्व या कथेतून लेखक सांगण्याचा प्रयत्न करतात. ङ्गअभिमानफ या कथेत संस्कृतीभिमानी भिकाचा चरस, गांजा,आणि गोमंतकातील मुला मुलींना ड्रग्सचे व्यसन लावणाऱ्या पाखल्याकडून म्हणजेच ड्रग्सचा व्यवसाय करण्यास पर्यटनाच्या नावाने येणाऱ्या परदेशी पर्यटकाशी झालेल्या झटपटीत खून होतो, पण तो नैसर्गिक म्हणून नोंदवला जातो व राष्ट्राचा अभिमान बाळगणाऱ्या भिकासाठी कोणीच पुढे सरसावत नाही अशी एकूण कथा आलेली आहे. गोव्यात पर्यटनामुळे निर्माण झालेली सद्यस्थिती व त्याला लाभलेले राजकीय वलय लेखक या कथेत मांडण्याचा प्रयत्न करतात. 'हवा' या कथेमध्येही पर्यटनामुळे शॅक (समुद्रकिनारी पर्यटकांसाठी थाटलेली निवासस्थाने) चालवायचा व्यवसाय स्वीकारल्यामुळे योगेशवर ओढवलेल्या स्थितीचे चित्रण लेखक करतात. भरपूर पैसा या व्यवसायात बळकावता येतो पण समाधानासाठी गवंडी कामसुद्धा चालेले अशी शेवटी या कथेतील योगेश या पात्राची स्थिती बनते. शहरातील आधुनिक जगण्याला कंटाळून परत गावाकडे जाऊ पाहणारा रामा 'ओढ' या कथेमध्ये लेखक चित्रित करतात. मानवासाठी विकास व प्रगती अत्यंत महत्त्वाचे आहे पण मुळांपासून तुटून प्रगतीच्या मार्गे जाता येत नाही असा सूर या कथांमधून व्यक्त होतो. मुळांशी बांधील राहत प्रगत होणे हा सार या कथांमधून व्यक्त झालेला दिसून येतो.

'आलकाण्याचो डोंगर' या कथासंग्रहात 'आलकाण्याचो डोंगर' या कथेमध्ये, सांस्कृतिक महत्त्व असलेला आलकाण्याचो

ISSN No. 2394-5990

डोंगर पर्यटन विकासासाठी फिगो नामक ब्रिटीश नागरिकाकडून विकत घेऊन बळकावण्याच्या प्रयत्नात केला जातो. तिथे रेव्ह पार्ट्या आयोजित केल्या जातात, अमली पदार्थांचे सेवन होऊ लागते याचे चित्रण लेखक करतात. 'रान' या कथेमध्येही विकास व पर्यटनामुळे डोंगर विकले जातात, व त्यात परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांच्या जीवनाची वाताहत कशी होते हे लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. 'देवचार' या कथेमध्ये पर्यटनामुळे गावातील लोकजीवनाचा भाग असलेल्या, सांस्कृतिक महत्त्व असलेल्या आणि पर्यटकांपासून अलिप्त राहिलेल्या समुद्रकिनाऱ्यांवरही पर्यटकांचे लोंढेच्या लोंढे येऊ लागल्यामुळे ग्राम संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृती कशी हवी झालेली आहे याचे चित्रण लेखक करतात. 'खेळ' या कथेमध्ये ग्राम संस्कृतीत झालेल्या परिवर्तनाचे, पर्यटनामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण करत गोमंतकीय तरुणाईला भेडसावणारे अमलीपदार्थाचे प्रश्न, शिवा या पात्राची पैसा व ड्रगच्या आहारी घेल्याने झालेली वाताहत लेखक मांडतात. 'झाड' ही त्यांची झाडांच्या कत्तलीचे चित्रण करणारी पर्यावरण केन्द्री कथा असल्याचे दिसते. 'आठवे आश्चर्य' या कथेमध्येही डोंगर विकला गेल्याने झाडांची झालेली कत्तल, तिथे उभारलेली कॉन्क्रीटची जंगले व पर्यावरणाचा झालेला ऱ्हास याचे चित्रण लेखक करतात. 'पणजीची कहाणी' या कथेमध्ये गोव्यातील राजधानी पणजीमध्ये विकासामुळे झालेली स्थित्यंतरे सांगताना पणजीतील कॅसिनोसंस्कृतीचे चित्रण करतात. 'आठवे आश्चर्य' व 'पणजीची कहाणी' या दोन्ही कथांमध्ये लहान मुलांच्या मनोविश्वाचे चित्रण करत, पर्यावरणीय प्रश्न त्यांच्या मनात बिंबवण्याचा प्रयत्न कथेमधून करत लेखक कथा पुढे आणतात. या संग्रहात 'लेनिनग्राड' ही कथा अत्यंत महत्त्वाची ठरते. पर्यटन आणि पैशांच्या मोहापायी ग्राम संस्कृतीला लागलेली काळिमा, या सर्वाला बळी पडलेला व वेश्या व्यवसायाला दिलेल्या प्रोत्साहनामुळे स्वतः एड्सचा बळी ठरलेल्या धनंजयच्या शोकांतिकेचे चित्रण लेखक करतात. विकासाच्या नावाखाली गोव्यातील ग्रामसंस्कृती नष्ट होत अनेक गावे पर्यटनामुळे निर्माण झालेल्या अनैतिक व्यवहारांचे भक्ष्य होत असल्याचे भान त्यांची कथा व्यक्त करते.

'मांड' या कथासंग्रहात आधुनिक जगण्यात गोमंतकीय 'धालो' परंपरेतून लोकसंस्कृतीची हरवत चाललेली चिन्हे लेखक 'मांड' या कथेतून मांडण्याचा प्रयत्न करतात. 'काळो आमो' या कथेमध्ये ग्रामजीवनाचा भाग असलेले आंब्याच्या झाडाचे कशापद्धतीने पर्यटन स्थळात रुपांतर होते याचे चित्रण येते. पर्यटन व साधनसुविधांच्या उपलब्धतेसाठी, बांधकामासाठी निसर्गाचा ऱ्हास कशापद्धतीने अनुभवास येतो याचे ज्वलंत चित्रण प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीचा वापर करून लेखक करतात. भाऊबंदकी व कौटुंबिक प्रश्न त्यांच्या लिखाणात जाणवतात. 'अतृप्त आत्मे' ही अशाच पद्धतीची कथा ठरते. ग्रामीण कृषी जीवनात होणाऱ्या बदलत्या स्थितीचे चित्रण 'आजोबांची संपत्ती' या कथेत आलेले दिसून येते. 'पांडुरंगाची प्रॉपर्टी' या कथेमध्ये पांडुरंग आपल्या आईकडून मिळालेली जमीन आईच्या निधनानंतर हंगामी तत्त्वावर भाड्यासाठी देतो. काजू, शेती करण्यासाठी कुळांना जमीन दिली जाते. पर्यटनाच्या नकाशावर नसलेला पांडुरंगाचे गाव व त्याची जागा बळकावण्यासाठी प्रयत्न होतात. आमिषे दिली जातात, राजकीय हस्तक्षेपही होतो, पत्नी मुलांचा रोष सहन करावा लागतो. पण पांडुरंग निष्ठावान असतो. आपल्या पश्चात आपली जमीन योग्य कामांसाठी, समाजासाठी वापरली जावी अशी मृत्यूपत्रेही तो तयार करतो पण त्याच्या मृत्युपश्चात मृत्युपत्र वाचण्याआधीच जमिनीचे हस्तांतरण झालेले असते. हॉटेल मालकाने भाट हस्तंगत केलेले असते. पांडुरंगाच्या शेवटच्या इच्छेनुसार त्याचे अंत्यसंस्कारही तिथे करण्यास मनाई होते. शेवटी राजकीय खेळीपुढे तो अपयशी होतो. गावाचे, शेतजमिनीचे रुपांतर पर्यटकाची मौजमजेसाठी आणि गरजा पुरवण्यास होते. 'गोशाळा', 'घर' या कथांमधूनही गोमंतकीय बदलत्या समाजजीवनाचे वास्तव चित्रण लेखक करतात.

गोमंतकीय प्रदेश जागतिकीकरणामुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेला सामोरे जात आहे. निसर्गसौंदर्याने विनटलेल्या या प्रदेशात पर्यटन हा व्यवसाय तेजीने चालत आहे पण त्याचबरोबर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा एक भाग म्हणून गोमंतकात पर्यटनासाठी येणारे पर्यटक व्यवसाय धंदा थाटण्याच्या प्रयत्नात आहे. ज्याचे चित्रण मिलिंद म्हामल यांची कथा करते. खा-उ-जा संस्कृती रुजवण्याच्या प्रयत्नात अनेक लोकपरंपरा व गोमंतकीय सांस्कृतिक मूल्ये व एकूण ग्रामसंस्कृती नष्ट होत चालल्याचे लेखक आपल्या कथांमधून लिहितात. ग्रामसंस्कृती पर्यटनामुळे नष्ट होत असताना अनैतिक व्यवहार, अमलीपदार्थ सेवन यात आजची पिढी कशापद्धतीने होरपळली जात आहे याचे चित्रण लेखक करतात. पर्यटनातून भरपूर पैसा मिळविण्यासाठी राजकीय हस्तक्षेप कशापद्धतीने साधला जातो आणि पारंपारिक व्यवसायांचे केंद्रस्थान असलेले डोंगर, बागायती, शेती, बांधकामासाठी कशापद्धतीने बळकावल्या जातात याचे चित्रण म्हामलांची कथा करते. पर्यावरणाचे असलेले विलक्षण भान कथाकार व्यक्त करतात. कॉन्क्रीटची जंगले उभारून भौतिक विकास साधला जातो पण आपला समाज प्रगत होत नाही तर अधोगतीच्या वाटेने जातो अशी बोधप्रधानता या कथांमधून व्यक्त होताना दिसते. भौतिक विकास फक्त झाडांची कत्तल करून किंवा इमारती बांधून होत नाही तर विकासाकडून

प्रगतशील असा समाज घडविण्यासाठी सांस्कृतिक मूल्ये व संस्कृतीशी असलेली निष्ठा अत्यंत महत्त्वाची ठरते, हे भान ही कथा व्यक्त करते. भौतिक विकासाबरोबर मानवी पारंपारिक व सांस्कृतिक मूल्ये समांतर जाणे यात जागतिक प्रगतीची चिन्हे असल्याचे ही कथा सांगते. त्यामुळे ही कथा फक्त गोमंत प्रदेशाची राहत नाही तर ती सार्वत्रिक होऊन जाते. विकास आणि आधुनिकतेच्या वाटा चोखाळताना मूळ सांस्कृतिक मूल्ये नष्ट करण्याच्या प्रयत्नात मानवी समाजात निर्माण झालेला भाऊबंदकीचा प्रश्न आणि त्यामुळे निर्माण झालेल्या अशांततेचे चित्रण करत सुखी जगण्यासाठी शांतितत्त्वाचा पुरस्कार ही कथा करते.

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचे आशयदृष्ट्या बदलते स्वरूप पुढे आणणारी म्हामलांची कथा. सद्यकालीन गोमंतकातील अत्यंत महत्त्वाच्या विषयांना पुढे आणत गोमंतकीय कथेचा नव्वदोत्तरी कालखंडातील नवा पायंड रचताना दिसते. ही कथा फक्त प्रश्न मांडत नाही तर शांतितत्त्वाचा पुरस्कार करत बोधप्रधान ठरते तसेच निसर्ग, संस्कृती, परंपरा यांचा समतोल साधत विकासातून प्रगतीच्या नव्या दिशा स्पष्ट करते.

**संदर्भग्रंथ :**


१. जोशी,सुधा. कथा: संकल्पना आणि समीक्षा. मौज प्रकाशन गृह, फेब्रुवारी २०००.

२. संपा. हेरोळे, गजानन. नव्वदोत्तरी मराठी कथा: रंग आणि अंतरंग (डॉ. रा. गो. चवरे गौरवग्रंथ). औरंगाबाद: गोदा प्रकाशन, २०१८.

३. जोशी,सुधा. मराठी कथा: १९४०-२००० एक परामर्श. मुंबई: मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस, २०१९.

४. कानोळकर, डॉ. बाळकृष्ण. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांची कथा : एक शोध. गोमंतक मराठी अकादमी, मार्च २००५.

५. फडके, ना. सी. लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र. व्हीनस प्रकाशन : पुणे. ऑगस्ट १९५२.

६. प्रा. जाधव, रा. ग. मराठीतील कथारूपे. स्नेहवर्धन पब्लिकेशन हाउस पुणे, नोव्हेंबर १९९९.

७. हातकणंगलेकर, म. द. मराठी कथा : रूप आणि परिसर. श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

८. राजपुरे - तापस, पुष्पलता. १९८० नंतरचे स्त्री निर्मित कथनपर साहित्य. शब्दालय प्रकाशन, डिसेंबर २०१०.

९. पंडित, अर्चना. पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे कथाविश्व - (प्रबंध). एप्रिल १९९९.

१०. केळकर, वृंदा माधव. गोमंतकीय कथा कादंबरी लेखनातील स्त्री व्यक्तिरेखा : एक पर्यालोचन- (प्रबंध). मे २०१०.

११. संपा. डॉ. प्रभुदेसाई, वि. भा. प्रा. घवी, रवींद्र. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड पहिला (आरंभ ते १९६१). गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.

१२. संपा. प्रा. नाडकर्णी, एस्. एस्. व डॉ. कोमरपंत, सोमनाथ. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दोन (मुक्तीनंतरचा कालखंड). गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन. २००३.

१३. डॉ. बनसोड, प्रवीण व प्रा. गावंडे, शांतरक्षित. जागतिकीकरण व ग्रामीण साहित्य.


**आधारग्रंथ:**


१. म्हामल, मिलिंद. चतुर्थी . स्वाती म्हामल, सांगोल्डा, बार्देश गोवा, २००५.

२. म्हामल, मिलिंद. आलकाण्याचो डोंगर . स्वाती म्हामल, सांगोल्डा, बार्देश गोवा, २००८.

३. म्हामल, मिलिंद. मांड . स्वाती म्हामल, सांगोल्डा, बार्देश गोवा, २०१४.


■■■